नि.फौ.ख.क्र.७९२/२०२१

नि.क्र.६१

मी शपथेवर खरे सांगतो की,

माझे नांव – रविंद्र दादाराव कडू,

वय अंदाजे ४० वर्ष, कामधंदा– शेती,

राहणार– चनाटाकळी, ता.जि.वर्धा

.........................................................................................................

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.७ ची सरतपासणी – सरकारी वकील श्रीमती ज्योती लकडे यांच्या मार्फत.**

१. दिनांक १०.०९.२०२१ रोजी पोलिसांनी मला पंच म्हणून चनाटाकळी येथे बोलाविले नव्हते. मला आता सूचनापत्र नि.क्र.५३ व घटनास्थळ पंचनामा नि.क्र.५४ जे मला दाखविण्यात आले त्यावर माझ्या सहया आहेत. त्यातील मजकूर मला माहीत नाही.

साक्षीदार हा त्याच्या पहिल्या बयाणास मुकारला असता, सरकारी वकीलांनी उलट तपासणीच्या स्वरुपात उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.

२. मी आरोपींना लहानपणापासून ओळखतो. मी फिर्यादीला देखील लहानपणापासून ओळखतो. आरोपी व फिर्यादी यांचे घर जवळजवळ आहे. हे म्हणणे खरे आहे की गजानन ढोणे यांचे घर टिनाचे व कुडाचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की पोलिसांनी माझे समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. मला सहीचे महत्व समजते. हे म्हणणे खरे नाही की त्यातील मजकूर वाचून त्यावर मी स्वाक्षरी केली. हे म्हणणे खरे आहे की मला फिर्यादी व आरोपींच्या भांडणात पडायची इच्छा नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपींना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृती

GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Date: 2025.10.15 17:45:56 +0530

(जी.व्ही.जांगडे–देशपांडे)

मुख्य न्यायदंडाधिकारी,

वर्धा, दिनांक १५–१०–२०२५

माझे समक्ष

GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Date: 2025.10.15 17:46:04 +0530

(जी.व्ही.जांगडे–देशपांडे)

मुख्य न्यायदंडाधिकारी,

वर्धा, दिनांक १५–१०–२०२५